# गणेशोत्सव सजावट स्पर्धा 2021:

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या 'मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस आणि तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी '**घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा**' आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **स्पर्धेसाठी नोंदणी**: स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी दि. 9 सप्टेंबर 2021 पर्यंत 9220699957 या क्रमांकावर SMS करून आपले नाव व राहण्याचे ठिकाण याची नोंदणी करावी.
- **भाग घेण्यासाठी पात्रता:** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/ हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या**: 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@ maratrhepratishthan.org या इमेल आयडी वर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी:** दि. 10 सप्टेंबर 2021 ते दि. 30 सप्टेंबर 2021.
- प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, **बिल्डींग/ सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत.** माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- **छायाचित्रे GPS Enabled असावीत. म्हणजे फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल.**
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/ वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

**या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके:**

**प्रथम पारितोषिक:** रु.1001/-:
**द्वितीय पारितोषिक**: रु. 751/-:
**तृतीय पारितोषिक:** रु. 501/-:

20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.

**टीप:**

1. मराठे प्रतिष्ठानच्या '**कार्यकारिणी सदस्यांना**' या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.
2. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.
3. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा.
4. कमीतकमी ७ प्रवेशिका आल्या तरच स्पर्धा घेण्यात येईल, अन्यथा स्पर्धा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. ई-मेल:hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: 9220699957